**दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लि., सातारा**

मुख्य कार्यालय :- ५२३ ब, अण्णासाहेब कल्याणी विद्यालय परिसर,
सदरबझार सातारा- ४१५ ००१



## सायबर सुरक्षेसाठी ग्राहकांनी घ्यावयाच्या काळजी संदर्भात

### -: परिचय :-

डिजिटल बँकिंगची सुविधा संदर्भात माहिती पुस्तिका पुरवताना आम्हाला आनंद होत आहे, त्यासोबत सायबर गुन्हे आणि बँकिंग फ्रॉड्सलाही तोंड द्यावं लागत आहे. अनेकवेळा ग्राहक न कळत ह्या गुन्ह्यांचे बळी ठरतात आणि सावध न राहिल्यामुळे त्यांना आर्थिक नुकसान सोसावं लागतं.

ह्या पुस्तिकेतून आम्ही जागरुकता निर्माण करत आहोत. सध्या चालू असलेल्या संशयास्पद आणि फसव्या कृती रोखण्यासाठी कोणती काळजी घ्यावी हे सुध्दा सूचवले आहे. तुम्ही सावध राहिलात तर तुमचं आर्थिक नुकसान होणार नाही.

आम्हाला विश्वास आहे की ही माहिती तुम्हाला खूप उपयोगी पडेल.

# दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लि., सातारा



मुख्य कार्यालय :- ५२३ ब, अण्णासाहेब कल्याणी विद्यालय परिसर,
सदरबझार सातारा- ४१५ ००१

## सायबर सुरक्षेसाठी ग्राहकांनी खालील काळजी घेणे आवश्यक आहे

### ATM वापराबाबत घ्यावयाच्या दक्षता

- बँकेतून ATM कार्ड मिळाल्यानंतर लगेच पहिला पिन नंबर बदलून नवीन पिन नंबर सेट करून घ्या व वापरा.
- ATM चा पिन नंबर महिन्यातून कमीत कमी एकदा तरी बदला आणि लक्षात ठेवा.
- ATM कार्डचा पिन नंबर कोठेही लिहून ठेऊ नका अथवा मोबाईल मध्ये सेव्ह करू नका.
- दोन किंवा अधिक ATM वापरत असाल तर एकसारखे पिन ठेऊ नका.
- हॉटेल मध्ये किंवा दुकानात ATM कार्ड दुस-याकडे देऊ नका आपल्या समोर स्वॅप करावयास सांगा.
- आपल्याशी संबंधित नंबर पिन म्हणून ठेवू नका उदा. मोबाईल नं चे अंक, जन्म वर्ष, गाडी नंबर इत्यादी
- फॅन्सी नंबरं ATM चे पिन ठेवू नका उदा ५५५५, १११११, ९९९९, ३३३३, ७७७७ इत्यादी
- कोणालाही फोनवरून ATM नंबर, पिन, पासवर्ड, OTP किंवा खात्याची माहिती सांगू नये.
- ATM कार्डचा सिरिअल नंबर, Validity Date किंवा CVV नंबर कोणालाही सांगू नका.
- EMV चीप असलेलेच ATM कार्ड वापरा.
- एटीएम कार्ड गहाळ झालेस तत्काळ बंद करा.
- सर्वत्र कार्ड' सेफ अ‍ॅप द्वारे तुमच्या ATM कार्ड चे लिमिटस् सेट करून जोखमी कमी करा.
- POS, ATMs वर किंवा ऑनलाईन डोमेस्टिक किंवा आंतरराष्ट्रीय ट्रॅंजॅक्शन्ससाठी तुम्ही लिमिटस् सेट करु शकता. कार्डच्या लिमिटच्या स्थितीत कोणताही बदल असल्यास, तुम्हाला SMS द्वारे सावध केले जाईल.

# दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लि., सातारा

मुख्य कार्यालय :- ५२३ ब, अण्णासाहेब कल्याणी विद्यालय परिसर,
सदरबझार सातारा- ४१५ ००१



## इंटरनेट बैंकिंग वापरताना घ्यावयाच्या दक्षता

- ❖ इंटरनेट बैंकिंगचा पासवर्ड स्ट्रॉंग ठेवा त्यामध्ये कॅपिटल अक्षरे, नंबर, चिन्हे. (Special Character) ठेवा.
- ❖ इंटरनेट बैंकिंगचा पासवर्ड कोठेही लिहून ठेऊ नका अथवा मोबाईल मध्ये सेव्ह करू नका.
- ❖ बँकेच्या अधिकृत वेबसाईट वरूनच इंटरनेट बैंकिंग करा.
- ❖ वेबसाईट ची URL हि https:// ने सुरु होत आहे याची खात्री करा.
- ❖ इंटरनेट बैंकिंग साठी व्यवहाराची उच्चतम मर्यादा सेट करून ठेवा.
- ❖ ऑनलाइन  व्यवहारासाठी विश्वसनीय वेबसाईटचा उपयोग करा.
- ❖ खात्यासाठी SMS Alert सेवा कार्यान्वित करून घ्या.
- ❖ लॅपटॉप किंवा संगणकात उत्तम व अपडेटेड अँटी व्हायरस टाकून घ्या.
- ❖ शक्यतो रात्री उशिरा इंटरनेट बैंकिंग वापरणे टाळा.
- ❖ अनोळखी लिंकवर क्लिक करू नका,
- ❖ फ्री वायफाय नेटवर्क वापरणे टाळा,
- ❖ सायबर / इंटरनेट कॅफेमधून इंटरनेट बँकिंग सेवा वापरणे टाळा.
- ❖ ऑटो फील किंवा पासवर्ड सेव्ह ऑप्शन वापरू नये.

## मोबाईल बँकिंग (Mobile App) करताना घ्यावयाच्या दक्षता

- ❖ मोबाईल मध्ये उत्तम व अपडेटेड अँटी व्हायरस टाकून घ्या.
- ❖ मोबाईल मध्ये अधिकृत संस्थेचीच Mobile App वापरा
- ❖ मोबाईल बँकिंगचा पासवर्ड स्ट्रॉग ठेवा त्यामध्ये कॅपिटल अक्षरे, नंबर, चिन्हे ठेवा
- ❖ Mobile App पॅटर्न किंवा पिन नंबर ने प्रोटेक्ट करा
- ❖ मोबाईल बँकिंग MMID किंवा पासवर्ड कोठेही लिहून ठेऊ नका अथवा मोबाईल मध्ये सेव्ह करू नका.
- ❖ ऑनलाइन बँकिंग व्यवहारासाठी सार्वजनिक खुल्या किंवा मोफत नेटवर्क वापर करू नका.
- ❖ मोबाईल वर आलेल्या कोणत्याही अनोळखी लिंक क्लिक करू नका.
- ❖ आपली बँक फोनवरून ATM नंबर, पिन, OTP, पासवर्ड किंवा खात्याची माहिती विचारत नसते.
- ❖ ऑफर, गिफ्ट किंवा बक्षिसांच्या खोट्या अमिषाला बळी पडू नका बँकेतील अधिकारी किंवा कर्मचारी फोनवरून किंवा ई-मेलवरून माहिती विचारू शकत नाहीत तरी असा कोणताही फोन किंवा आपला ओटीपी पिन किंवा कार्ड ची माहिती कोणालाही सांगू नका.
- ❖ एटीएम मशीनद्वारे केलेल्या व्यवहार असफल झालेले झाल्यास निर्धारित वेळेच्या आत आपले खात्यातून डेबिट झालेली रक्कम पुन्हा आपल्या खात्यात जमा झाले नसल्यास संबंधित शाखा किंवा बँकेच्या टोल फ्री नंबर १८००२३३५६८५ त्वरीत संपर्क साधा.आपली तक्रार विना विलंब नोंदवा.



## फसवणुकीचे मेसेज व फोन कॉल

- जर आपल्याला रिझर्व बँकेच्या व इतर संस्थेच्या नावाने मोठी रक्कम मिळवणे बाबत संदेश मिळाला तर त्यावर विश्वास ठेवू नका तसेच रक्कम मिळवण्यासाठी आपले खाते क्रमांक व इतर माहिती देऊ नका किंवा कुठलीही रक्कम जमा करू नका अशा संदेशाकडे दुर्लक्ष करा.
- धोकेबाज केवायसी अध्यावत करण्यासाठी किंवा इतर कारण सांगून आपले खाते क्रमांक एटीएम पिन सी व्ही व्ही माहिती मागवण्यात किंवा लिंक पाठवून किंवा बँक अथवा आरबीआय कर्मचारी असे सांगून आपली वैयक्तिक माहिती काढून घेऊ शकतात व आपले खात्यातून पैसे काढून घेऊ शकतात अशा फसवणुकीतून पासून जागरूक व सतर्क रहा.
- आपली बँक खात्यातील व्यवहाराबाबत त्वरित माहिती अलर्ट मिळण्यासाठी बँकेमध्ये आपला मोबाईल नंबर व मेल रजिस्टर करा जर आपण न केलेल्या व्यवहाराबाबत मेसेज येतात तर त्वरित बँकेच्या निदर्शनात आणून द्या.
- अनाधिकृत नंबर किंवा व्हॅट्सऍप वरून आलेल्या कोणत्याही लिंकवर क्लिक करू नका
- मोठ्या पैशांचे आमिष दाखवणारे ई-मेल्स, कॉल्स व संदेश हे खोटे असतात. तुमचे मेहनतीचे पैसे धोक्यात घालू नका
- जर तुमची आर्थिक फसवणूक झाली असेल, तर तुम्ही या Cybercrime Helpline number १९३० वर कॉल करू शकता आणि नाव, संपर्क तपशील, तुमचे अकाऊंट डिटेल्स आणि ज्या खात्यात पैसे ट्रान्सफर झाले आहेत त्या अकाऊंटचा तपशील, Transaction ID यासारखी काही महत्त्वाची माहिती देऊन तक्रार Online Cybercrime Complaint नोंदवू शकता.
- सायबर क्राईमची फसवणूक झाली असेल आणि त्यासंदर्भात तक्रार दाखल करायची असेल तर सर्वप्रथम https://cybercrime.gov.in या साईटवर जा.

**-: धन्यवाद :-**